## प्रेस नोट दिनांक २८/०५/२०१९

## स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे

## हरविलेली रोख रक्कम असलेली पर्स केली परत

दिनांक १९/०५/२०१९ रोजी महिला नामे प्रत्युशा मेकला,वय ३३ वर्ष रा. एल. एन्ड टी पवई गेट नं. १ एन. बी. २ /४ पवई ४०००७२ या काही कामानिमीत्त पुणे येथे आल्या होत्या परत पवई येथे जाणेसाठी स्वारगेट एस.टी. स्टॅंड येथे आल्या तेथे त्यांचे रोख रक्कम रू. १५०० तसेच १५ युरो व त्यांचे महत्वाचे मुळ कागदपत्रे ज्य़ामधे ७ ते ८ डेबीट तसेच क्रेडीट कार्ड असलेली पर्स स्वारगेट स्टॅंड येथे हरविली होती. परंतू त्या प्रवासात असलेने त्यांनी त्याबाबत तक्रार नोंद केली नाही. स्वारगेट एस.टी.स्टॅंड येथील कर्तव्यावरील पोलीस कर्मचारी पो.ना. ४७८३ खोमणे यांना पेट्रोलींग दरम्यान पर्स मिळून आली परंतू त्यामधे संपर्क क्रमांक असे काही कागदपत्र मिळून आले नाही. तरीही पो.ना. खोमणे यांनी माघार न घेता त्या पर्स मध्ये असलेल्या अमेरिकन एक्सप्रेस या कार्ड वरील टोल नंबरवर संपर्क साधून सदर कार्डधारकाची माहिती मागितली असता,सदर कंपनी ही त्यांचे कार्डधारकाची माहिती देवू शकत नसलेबाबत सांगितले त्यावर पो.ना. खोमणे यांनी निराश न होता कंपनीतूनच त्यांना संपर्क साधणेबाबत सांगून कॉन्फरन्स वर बोलणे करून देणेबाबत विनंती केली त्यावर सदर कंपनीने कॉन्फरन्सवर सदर कार्ड धारकाशी बोलणे करून दिले असता, सदर कार्ड हे प्रत्युशा मेकला वय ३३ वर्ष रा. एल.एन्डटी.पवई गेट नं.१ एन.बी.२/४,पवई ४०००७२ यांचे असलेबाबत त्यांनी सांगितले व दि. १९/०५/२०१९रोजी त्यांची पर्स स्वारगेट येथे हरविलेबाबत सांगून मी सुट्टीचे दिवशी स्वारगेट पोलीस स्टेशन येथे येवून पर्स घेवून जाणेबाबत कळविले त्याप्रमाणे दि. २६/०५/२०१९ रोजी त्या स्वारगेट पोलीस स्टेशन येथे येवून त्यांचे पर्स ची ओळख पटवून त्यांची पर्स मा. पोलीस निरीक्षक (गुन्हे)श्री. सय्यद यांचे समक्ष त्यांना परत केली आहे.

